आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
४ एप्रिल २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारताचं एलपीजी वाहक जहाज ‘ग्रीन सान्वी', होर्मुझ सामुद्रधुनी पार करून मुंबईच्या दिशेने रवाना

- अमेरिकेनं दिलेल्या ४८ तासांच्या युद्धबंदीचा प्रस्ताव फेटाळत आखाती देशातील अमेरिका आणि इस्रायलच्या पायाभूत सुविधांवर हल्ले करण्याचा इराणचा इशारा

- पुदुच्चेरी आणि ४ राज्यातल्या विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला

**आणि**

- नाशिक जिल्ह्यात दिंडोरी इथं गाडी विहीरीत कोसळून ९ जणांचा मृत्यू/ मृतांच्या कुटुंबांना ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय जहाज ‘ग्रीन सान्वी', ४४ हजार टन एलपीजी घेऊन होर्मुझ सामुद्रधुनी पार करून मुंबईच्या दिशेने रवाना झालं आहे. इराणनं  होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अनेक निर्बंध लादले असले तरी भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना सुरक्षितपणे जाण्याची परवानगी दिली आहे. युद्ध सुरू झाल्यापासून गेल्या महिन्याभरात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणारं हे सातवं भारतीय जहाज आहे. सामुद्रधुनीच्या पश्चिमेला अडकलेल्या १७ भारतीय जहाजांपैकी, 'ग्रीन आशा' आणि 'जग विक्रम' ही दोन जहाजं देखील  एलपीजीनं भरलेली आहेत. या जहाजांना सामुद्रधुनी पार करण्याची लवकरच परवानगी मिळेल आणि एलपीजीच्या तुटवड्याचा सामना करणाऱ्या भारतीयांना मोठा दिलासा मिळेल, असं  वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाचा भारताने धैर्याने सामना केला आहे, असं मत परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांनी व्यक्त केलं. ते आज आयआयएम रायपूरच्या दीक्षांत समारंभात बोलत होते. पश्चिम आशियात सुरू असलेला संघर्ष आणि त्याचे व्यापक आर्थिक परिणाम यांचा संदर्भ देत त्यांनी हे विधान केलं. वाढत्या अशांत जागतिक वातावरणातही भारताने देशांतर्गत आणि बाह्य दोन्ही आव्हानांचा यशस्वीपणे सामना केला आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

संपूर्ण देशभरात पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालयानं म्हटलं आहे. नागरिकांनी घाबरुन जाऊन पेट्रोलचा साठा आणि गॅसची अनावश्यक नोंदणी करु नये असा सल्लाही मंत्रालयानं दिला आहे. गॅसच्या सुरळीत पुरवठ्यासाठी सर्व एलपीजी गॅस वितरकांकडे पाच किलो वजनाच्या गॅसचे सिलिंडर उपलब्ध असून कोणत्याही ओळखपत्राच्या आधारे वास्तव्याचा पुरावा न देता ते खरेदी करता येतील असंही स्पष्ट करण्यात आलं आहे. गॅसच्या नोंदणीमध्ये ९५ टक्क्यांनी वाढ झाली असून काल ५१ लाख घरगुती वापराच्या गॅस सिलिंडर पुरवण्यात आल्याची माहितीही मंत्रालयानं दिली आहे. गेल्या महिन्यात साडेतीन लाख पीएनजी गॅस जोडणी करण्यात आली असून नागरिकांना इंडक्शन आणि इलेक्ट्रिक शेगड्या वापरण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत असल्याचंही पेट्रोलियम मंत्रालयाने सांगितलं आहे.

<><><><><>

पश्चिम आशियामधला संघर्ष सातत्यानं वाढत असून अमेरिकेनं दिलेल्या ४८ तासांच्या युद्धबंदीचा प्रस्ताव इराणनं फेटाळला आहे. आपल्याला हा प्रस्ताव अमान्य असल्याचं इराणनं हल्ला अधिक तीव्र करत दाखवून दिलं. जोपर्यंत

आपल्या अटी पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत लष्करी कारवाया सुरूच ठेवण्याचा निर्धारही इराणनं व्यक्त केला आहे. तर अमेरिका आणि इस्त्रायलच्या सैन्यानं देखील इराणच्या हद्दीत नव्यानं हल्ले करुन दबाव कायम ठेवला आहे. इराणमध्ये महत्त्वाच्या पायाभूत सुविधा असलेल्या भागात आणखी जीवितहानी झाल्याचं इराणनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिका आणि इस्त्रायलशी संबंधित आखाती देशातील पायाभूत सुविधांवर हल्ले करण्याचा इशारा इराणचे लष्करी प्रवक्ते इब्राहिम झोल्फघारी यांनी दिला आहे, त्यामुळे पश्चिम आशियातील संघर्ष आणखी चिघळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, आज सकाळी दुबईमध्ये हवाई हल्ल्यांच्या वेळी उडालेल्या घटकांचा काही भाग इमारतींवर आदळला. त्यामुळे इमारतीच्या दर्शनी भागाचे मर्यादित नुकसान झालं, परंतु कोणतीही जीवितहानी किंवा आग लागली नाही. दरम्यान,अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे की, अमेरिकन लष्करी विमाने पाडल्याने इराणसोबतच्या राजनैतिक संबंधांवर परिणाम होणार नाही तसंच इराणसोबतची चर्चाही सुरू राहील. इराणने अमेरिकेचं दोन आसनी एफ-१५ई लढाऊ विमान पाडलं, तर एक ए-१० विमान लक्ष्यभेद झाल्यानंतर कुवेतवर कोसळलं. दोन वैमानिकांना वाचवण्यात आले आहे, तर तिसरा अद्याप बेपत्ता असून, इराणी सैन्य शोधमोहीम राबवत आहे.

**<><><><><>**

तेलाच्या पुरवठ्यात दीर्घकाळ व्यत्यय येण्याच्या शक्यतेने जागतिक कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे. येत्या काही आठवड्यांत अमेरिका इराणवरील हल्ले सुरूच ठेवेल, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटल्यानंतर ही घडामोड

झाली. कच्च्या तेलाच्या दरांमध्ये ११ पूर्णांक ४ शतांश टक्क्यांची वाढ होऊन ते १११ अमेरिकन डॉलर्स आणि ५४ सेंट्स प्रति बॅरलवर पोचल्याचं WTI अर्थात वेस्ट टेक्सास इंटरमीडिएटने जाहीर केलं. त्यानंतर हे दर १०९ अमेरिकन डॉलर्स आणि तीन सेंट्स प्रति बॅरलवर स्थिरावले.

**<><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी केरळमधे आज विविध पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या सभा झाल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज तिरुवल्ला इथं आयोजित प्रचारसभेला संबोधित केलं. महिला सबलीकरण हे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं मुख्य ध्येय असून सरकारच्या अनेक धोरणांमुळे महिलांचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे, असं ते यावेळी म्हणाले. केरळमध्ये ऐतिहासिक सत्तापरिवर्तन होणार असून राज्यात सर्वत्र जनतेचा रालाओवरचा विश्वास दिसून येत आहे असंही ते म्हणाले. यावेळी त्यांनी लेफ्ट डेमोक्रेटिक फ्रंट आणि युनायटेड डेमोक्रेटिक फ्रंट या आघाड्यांवर  जोरदार टीका केली.

**<><><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी अलपुझ्झा, इडुक्की आणि एर्नाकुलम  इथं सभा घेतल्या. यावेळी त्यांनी डाव्या आघाडीवर आणि रालोआवर टीका केली. या निवडणुकीनंतर डाव्या लोकशाही आघाडीची प्रासंगिकता संपुष्टात येणार असून यूडीएफ केरळमधे खराखुरा बदल घडवून आणण्याासठी सज्ज आहे, असं गांधी म्हणाले.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस एम ए बेबी आणि सुभाषिनी अली यांनीही डाव्या आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी विविध मतदारसंघात सभा घेतली. माकप कुणाचंही लांगूलचालन करत नसून अल्पसंख्यकांच्या हक्काचं संरक्षण करण्यासाठी काम करते असं बेबी यावेळी म्हणाले. केरळमधे आज सर्व पक्षांच्या महत्त्वाच्या नेत्यांनीही विविध ठिकाणी सभा घेतल्या.

**<><><><><>**

पुद्दुचेरीसह पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि आसाम मधेही आगामी विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराला वेग आला असून विविध राजकीय पक्षांचे प्रमुख नेते जाहीरसभा, रॅली आणि रोडशोच्या माध्यमातून प्रचार करत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज तामिळनाडूमध्ये चेन्नई इथं प्रचारसभा घेतली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज आसाममध्ये प्रचारसभा घेतली.

दरम्यान निवडणूक आयोगानं पश्चिम बंगालमधल्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी ४ हजार ६६०हून अधिक सहायक मतदान केंद्र उभारायला मंजुरी दिली आहे. ज्या मंतदारसंघांमध्ये मतदारांची संख्या बाराशे पेक्षा अधिक आहे, अशा ठिकाणी सहायक मतदार संघ स्थापन केले जाणार आहेत.

आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी मध्ये येत्या ९ एप्रिलला, तामिळनाडूमध्ये २३ एप्रिलला तर पश्चिम बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातल्या दिंडोरी इथं कार विहिरीत कोसळल्यानं एकाच कुटुंबातल्या ९ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये ६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. एका खासगी शिकवणी वर्गाचं स्नेहसंमेलन आटोपून हे सर्वजण निघालेले असताना मंगल कार्यालयाजवळच्या शेतातल्या विहिरीत त्यांची कार कोसळली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे. तसंच जिल्हाप्रशासनाला दुर्घटनेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. आपत्कालीन व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन तसंच अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी आज घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या दुर्घटनेला कारणीभूत झालेली विहीर तातडीनं बुजवण्याचे निर्देश नगरपालिकेला दिल्याचं महाजन यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रातील धुळे इथं सुरत - नागपूर महामार्गावर आज दुपारी क्रूझरच्या चालकाचं नियंमत्रण सुटल्यामुळे झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून १४ जण जखमी झाले आहेत. जखमींवर धुळे जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत अहमदाबाद इथं सुरु गुजरात टाययन्स विरुद्ध राजस्थान रॅायल्स यांच्यात सामना सुरू आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा राजस्थान रॅायल्सनं ७ षटकात एका गड्याच्या बदल्यात ७४ धावा केल्या आहेत. राजस्थान रॅायल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे.

**//<><><><><>//**